TITLE-CODE:- MAHMAR52789

# आपला मराठी टाइम्स

संपादक : अनिल राजाराम पवार    कार्यकारी संपादक: मुकेश आर्मा देवेंद्र    APLA MARATHI TIMES

वर्ष : १ ● अंक : ३४ ● साप्ताहिक ● मुंबई ● भाषा : मराठी ● सोमवार : १९ ते २५ ऑगस्ट २०२४ ● पृष्ठ - ८ ● मुल्य : ६ रुपये

# विद्यार्थी वाऱ्यावर, गुरुजी इलेक्शन ड्युटीवर



संग्रहित छायाचित्र

## घटक चाचणी परीक्षेच्या तोंडावर २ हजार शिक्षक बनणार बीएलओ

**मुंबई** : लोकसभा निवडणुकीचा निकाल जूनमध्ये लागून त्याची प्रक्रिया संपली नाही तोच अवघ्या दोन महिन्यांत शिक्षकांना पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीएलओ ड्युटीच्या (मतदार केंद्रस्तरीय अधिकारी) कामाला जुंपण्यात आले आहे. निवडणूक जिल्हा अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार पालिका शाळांतील तब्बल २ हजार शिक्षकांना १६ ऑगस्टपूर्वी संबंधित मतदारसंघाच्या निवडणूक कार्यालयात हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शाळा सुरू होऊन अवघे दोन महिने झाल्यानंतर शिक्षकांना पुन्हा निवडणुकीच्या कामाला लावल्याने त्यांनी विद्यार्थ्यांना शिकवायचे कधी? ड्युटीवरील शिक्षक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणार कसे? असे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीच्या कामासाठी मुंबई महापालिकेकडे ८,५०० कर्मचाऱ्यांची मागणी केली आहे. यात पालिकेच्या शिक्षण खात्यातील दोन हजार कर्मचारी असतील.

**गुरुवार, शुक्रवार, शनिवारी निवडणुकीचे काम**

विधानसभा निवडणुकीच्या कामासाठी पाठवण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना आठवड्यातील तीन दिवस म्हणजेच गुरुवार, शुक्रवार, शनिवारी निवडणुकीची कामे करावी. सोमवार, मंगळवार आणि बुधवारी या कर्मचाऱ्यांनी शाळेत उपस्थित राहून शालेय कामकाज पार पाडावे, असे महापालिका प्रशासनाने आदेशात स्पष्ट म्हटले आहे. निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्याच्या कामाला शिक्षकांना जुंपले जात आहे. मात्र या कामासाठी आधीच पालिकेच्या विविध विभागांतील कर्मचारी तसेच शिक्षकही गेल्या अनेक वर्षांपासून निवडणूक विभागात कार्यरत आहेत. तरीही हे काम अद्याप का पूर्ण होऊ शकले नाही, असा सवाल शिक्षक करीत आहेत.

**शनिवार, रविवारची भरपाई नाही**

शनिवार व अन्य सुटीच्या दिवसाच्या कामाची भरपाई महानगरपालिकेकडून मिळणार नाही, असे पालिका शिक्षण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. शिवाय कर्मचारी त्यांच्या मतदारसंघ कार्यालयात रुजू झाल्याबाबत खातरजमा करून शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरे, माध्यमिक व खासगी अनुदानित यांच्या उपशिक्षणाधिकारी यांनी त्याबाबतचा अहवाल दि. १६ ऑगस्टपूर्वी सादर करणे आवश्यक असणार आहे.

**परीक्षांचा अभ्यासक्रम पूर्ण कसा होणार ?**

१५ जूनला शाळा सुरू झाल्यानंतर आता चाचणी परीक्षा सुरू होतील आणि काही दिवसांत दिवाळीपूर्वी सहामाही परीक्षांना सुरुवात होतील.मात्र, या काळात शिक्षकच शाळांमध्ये नसतील तर अभ्यासक्रम पूर्ण कसा होईल, यावर पालकांनीही प्रश्न उपस्थित केले आहेत. निवडणुकांसाठी मुलांच्या परीक्षांवर आणि अभ्यासावर पाणी सोडायचे का, असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. आठवड्यातील ३ दिवसांत शिक्षक विद्यार्थ्यांना अभ्यास कसा शिकवणार? दूर करणार? या शिक्षणाला काही गुणवत्ता असेल का, असे पालक विचारत आहेत.


## खासदारकीला आव्हान : विनायक राऊतांच्या याचिकेवर नारायण राणे यांना समन्स



**मुंबई** : माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातील भाजप नेते नारायण राणे यांच्या खासदारकीला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यांच्या याचिकेची न्यायालयाने शुक्रवारी दखल घेतली व राणे यांना समन्स बजावून राऊत यांनी केलेल्या आरोपांवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. राणेंसह त्यांच्या प्रचार कार्यकर्त्यांनी विजय मिळवण्यासाठी भ्रष्ट आणि बेकायदेशीर पद्धतींचा अवलंब केल्याचा आरोप राऊत यांनी निवडणूक याचिकेद्वारे केला आहे. वकील असीम सरोदे यांच्यामार्फत केलेल्या राऊत यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या एकलपीठासमोर शुक्रवारी सुनावणी झाली. त्यावेळी, एकलपीठाने राणे यांना समन्स बजावून त्यांना राऊत यांच्या याचिकेवर १२ सप्टेंबरपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. लोकसभेच्या रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघासाठी ७ मे रोजी पार पडलेल्या निवडणुकीत राणे विजयी झाले. त्यांनी राऊत यांचा ४७,८५८ मतांनी पराभव केला. मात्र, निवडणुकीदरम्यानची एक चित्रफित समाजमाध्यमातून प्रसारित झाली. त्यात, राणे समर्थक मतदारांना पैसे वाटून राणे यांनाच मतदान करण्यास सांगत आहेत. या चित्रफितीची स्वतंत्र समितीद्वारे चौकशी करावी आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून राणे यांची खासदारकी रद्द करावी, अशी मागणी राऊत यांनी केली आहे. त्यासह याचिकेवरील अंतिम सुनावणीपर्यंत राणे यांना खासदार म्हणून काम करण्यापासून मज्जाव करावा, अशी मागणीही राऊत यांनी केली आहे.

## डहाणू तालुक्यात पुन्हा भूकंपाचे धक्के

**डहाणू/ कासा** : डहाणू तालुक्यातील धुंदलवाडी, कासा, गंजाड परिसरात (१७ ऑगस्ट) पहाटे ६.३५ वाजताच्या सुमारास तीव्र आणि सौम्य स्वरूपाचे दोन भूकंपाचे धक्के बसले आहेत. भूकंपामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आज पहाटे ६.३५ च्या सुमारास भूकंपाचा पहिला धक्का बसला असून ६.४० च्या सुमारास दुसरा सौम्य धक्का जाणवला. दोन धक्क्यांपैकी एकाची तीव्रता ३.६ रिष्टर स्केल इतकी नोंदविण्यात आली असून याची खोली १० किलोमीटर इतकी आहे. तर दुसरा धक्का हा सौम्य असल्यामुळे त्याची नोंद झाली नसल्याची माहिती मिळत आहे. पालघर जिल्ह्यात २०१८ पासून भूकंपाचे धक्के बसण्याचे प्रकार सुरू आहेत. मध्यंतरी भूकंपाचे प्रमाण कमी झाल्यामुळे धोका टळल्याची शक्यता व्यक्त होत होती. मात्र पुन्हा भूकंपाचे धक्के जाणवल्यामुळे भूकंपाचे सत्र पुन्हा सुरू होण्याची भीती व्यक्त होत असून भूकंप प्रवण क्षेत्रात राहणाऱ्या





नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भूकंपाचे धक्के जाणवल्यानंतर त्या संदर्भातील माहिती मिळवण्यासाठी शासकीय यंत्रणा प्रयत्नशील होती. मात्र किमान दोन तास त्याविषयी संबंधित संकेतस्थळावर माहिती उपलब्ध न झाल्याने हे धक्के सौम्य असावेत असा शासकीय यंत्रणेचा समज झाला. मात्र नंतर भूकंप संकेतस्थळावर घडलेल्या भूकंपाची तीव्रता निर्देशित करण्यात आल्यानंतर ३.६ तीव्रतेचा भूकंप झाल्याचे स्पष्ट झाले. शासकीय संकेतस्थळावर याचा प्रभाव व्यापक दृष्टीने दिसत असला तरी त्याची तीव्रता डहाणू तालुक्यात जाणवल्याचे सांगण्यात आले. या भूकंपात कोणतेही मोठे नुकसान झाल्याची माहिती अजून पर्यंत पुढे आली नाही.

# तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या, निवडणूक आयोगाचे आदेश; मंगळवारपर्यंत मुदत





**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकाच विधानसभा मतदारसंघात तीन वर्षांचा कार्यकाल पूर्ण झालेल्या किंवा त्याच शहरातील मूळ रहिवासी असलेल्या महसूल, पोलीस, उत्पादनशुल्क, महापालिका, महामंडळातील अधिकाऱ्यांच्या बदल्या तातडीने येत्या मंगळवारपर्यंत करण्याचा आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिले आहेत. राज्यातील विधानसभा निवडणुका मुक्त आणि मोकळ्या तसेच पारदर्शी वातावरणात पार पडाव्यात यासाठी निवडणूक प्रक्रियेशी संबंधित महसूल आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्याच्या मुख्य सचिवांना दिले आहेत. त्यानुसार एकाच पदावर तीन वर्षांचा कार्यकाल पूर्ण केलेल्या किंवा गृह जिल्हा असलेल्या पोलीस दलातील आयुक्त, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपायुक्त, निरीक्षक, उपनिरीक्षक आदी तसेच जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी अशा महसूल अधिकाऱ्यांच्या तसेच विभागीय आयुक्त, पालिका आयुक्त, महामंडळांमध्ये प्रतिनियुक्तीवर नियुक्त असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश दिले आहेत. यापूर्वी बदल्यांच्या या नियमातून पालिका आयुक्त आणि महामंडळातील अधिकाऱ्यांना सूट होती, मात्र लोकसभा निवडणुकीपासून या अधिकाऱ्यांनाही निवडणूक आयोगाने बदल्यांचे नियम लागू केले आहेत. निवडणूक आयोगाच्या या आदेशानंतर मंत्रालयात तसेच पोलीस महासंचालक कार्यालयात बदलीस पात्र अधिकाऱ्यांचा शोध सुरू झाला असून येत्या दोन दिवसांत अशा अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढले जातील अशी माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली. आयोगाच्या आदेशान्वये शनिवारी उत्पादन शुल्क विभागातील सात अधीक्षकांसह ७० अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यात आले असून त्यांना त्वरित बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यास बजावण्यात आले आहे. तसेच बदलीच्या ठिकाणी रुजू न होणाऱ्या अधिकाऱ्यांवर आयोगाच्या आदेशानुसार कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

# विद्यार्थिनीवर बलात्कारानंतर संतप्त पालकांचा शाळेवर मोर्चा, अनेक मुलींचे लैंगिक शोषण झाल्याचा आरोप





**वसई :** नालासोपारा पूर्वेच्या यादवेश विकास शाळेत १४ वर्षीय विद्यार्थिनीवर शाळेतील शिक्षकाकडून झालेल्या लैंगिक अत्याचाराचे तीव्र पडसाद उमटले आहे. मंगळवारी संतप्त पालकांनी शाळेबाहेर उग्र आंदोलन करून शाळा बंद करण्याची मागणी केली. शाळेत अनेक मुलींसह शिक्षिकांचे देखील लैंगिक शोषण झाल्याचा आरोप पीडित मुलीच्या भावाने केला आहे. नालासोपारा पूर्वेच्या संतोष भुवन येथे यादवेश विकास इंग्रजी शाळा आहे. आरोपी अमित दुबे (३०) हा या शाळेत शिक्षक आहे. तसेच तो वलईपाडा येथे उज्वल नावाचे खासगी शिकवणी वर्ग (क्लासेस) घेतो. दुबे याने शाळेतील १४ वर्षीय विद्यार्थिनीवर सतत ५ महिने लैंगिक अत्याचार करत असल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. पीडित विद्यार्थिनीला धमकावून तो शाळा आणि शिकवणी वर्गात (क्लासेस) बलात्कार करत होता. पीडितेच्या कुटुंबियांना हा प्रकार समजताच त्यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पेल्हार पोलिसांनी आरोपी शिक्षक अमित दुबे याला अटक केली आहे. हा प्रकार समजताच मंगळवारी सकाळी संतप्त पालकांनी शाळेबाहेर उग्र निदर्शने करून शाळा बंद करण्याची मागणी केली. शाळेच्या व्यवस्थापकाला पीडित मुलीने आरोपी शिक्षकाकडून त्रास होत असल्याचे सांगूनही त्याने दुर्लक्ष केले आणि पीडितेला गप्प बसण्यासाठी सांगितले, असा आरोप मुलीच्या पालकांनी केला. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पीडित मुलीच्या भावाने शाळेच्या व्यवस्थापनावर गंभीर आरोप केले आहे. यापूर्वी शाळेतील २० ते २५ मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप त्याने केला. शाळेतील शिक्षिका देखील या अत्याचाराला बळी पडली असून तिने शाळा सोडल्याचे त्याने सांगितले. माझी बहीण शाळेत बेशुद्ध पडली मात्र शाळेने प्रकार दडवला आणि आरोपींना पाठीशी घातले. त्यामुळे शाळेच्या व्यवस्थापकावरही गुन्हे दाखल करून ही शाळा बंद करण्याची मागणी केली. पेल्हाप पोलिसांनी आरोपी अमित दुबे याला भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४ (२) (एफ) ६५ (१) तसेच बालकांच्या लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो)च्या कलम ४, ५, ८ आणि १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सध्या शाळा परिसरात तणावाचे वातावरण असून पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे.

# दंड मागितल्याने टीसीला मारहाण; शर्ट फाडला, बुक्के मारले आणि.., विरार एसी लोकलमधला व्हिडीओ व्हायरल



**मुंबई :** लोकलला मुंबईची लाईफलाईन म्हटलं जातं. पश्चिम, मध्य आणि हार्बर मार्गावर रेल्वेची लोकल सेवा आहे. आपल्या कार्यालयाच्या ठिकाणी जाण्यासाठी तसंच संध्याकाळी घरी जाण्यासाठी लोकलचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. याच लोकलमध्ये टीसीला मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. पश्चिम रेल्वे मार्गावरचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चर्चेत आला आहे. चर्चगेटहून विरारच्या दिशेने एसी लोकल निघाली होती. या एसी लोकलमध्ये जसबीर सिंग हे टीसी चढले होते. त्यांनी तिकिट तपासण्यास सुरुवात केली. त्यावेळी तीन जण फर्स्ट क्लासचं तिकिट घेऊन एसी लोकलमध्ये चढले. त्यामुळे जसबीर सिंग यांनी या तिघांना दंड ठोठावला. मात्र हे तिघेही टीसी जसबीर सिंग यांच्याशी वाद घालू लागले. नंतर या वादाचं रुपांतर शिवीगाळ आणि हाणामारीत झालं. जसबीर सिंग यांचा शर्ट फाडत आणि त्यांना प्रचंड प्रमाणात शिवीगाळ करत या तिघांनी त्यांना मारहाण केली. या मारहाणी जसबीर सिंग यांना दुखापत झाली आहे. जसबीर सिंग हे मुख्य तिकीट निरीक्षक म्हणून काम करतात. चर्चगेटहून विरारच्या दिशेने निघालेली लोकल बोरिवली स्थानकात पोहचत होती. त्यावेळी जसबीर सिंग हे तिकिट तपासत एक एक डब्यात पुढे जात होते. त्याचवेळी तीन प्रवाशांकडे फर्स्ट क्लासचं तिकिट आहे एसीचं नाही हे त्यांना कळलं. त्यामुळे त्यांनी या तिघांनाही सांगितलं की तुम्ही तिघांनी दंड भरा आणि पुढचा प्रवास सुरु ठेवा. अशात अनिकेत भोसले नावाच्या एका प्रवाशाने त्यांच्याशी वाद सुरु केला. यानंतर सिंग यांनी या तिघांना बोरिवली स्थानकात उतरा असे सांगितले मात्र तिघांनीही नकार दिला आणि वाद घालण्यास सुरुवात केली. यानंतर अनिकेत भोसले, त्यांच्यासह असलेले दोघेजण आणि टीसी जसबीर सिंग यांच्यात हाणामारी झाली. व्हायरल व्हिडीओमध्ये दिसतं आहे त्यानुसार हे तिघंही त्यांच्यावर धावून जातात, शर्ट फाडतात आणि शिवीगाळ करत त्यांना मारहाण करु लागतात. अनिकेत भोसले आणि इतर दोघांनी या टीसीला शिव्याही दिल्या. या घटनेची माहिती मिळताच आरपीएफ आणि जीआरपी या रेल्वे डब्यात आले. त्यानंतर सिंग यांनी सगळा प्रकार सांगितला. अभिषेक यादव या मुंबईकराने या सगळ्यानंतर काय घडलं तो व्हिडीओ पोस्ट केला आहे.

# नालासोपाऱ्यात दोन कोटींचे अमली पदार्थ जप्त; नायजेरियन महिलेला अटक

**वसई :** तुळींज पोलिसांनी एका नायजेरीयन महिलेला अटक केली असून तिच्याकडून दोन कोटी रुपयांचे मॅफेड्रॉन हे अमली पदार्थ जप्त केले आहे. नालासोपारा शहरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये अमली पदार्थांचा व्यवहार चालतो. एक नायजेरियन महिला अमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती तुळींज पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार मध्यरात्री नालासोपारा पूर्वेच्या प्रगती नगर येथील एसपी अपार्टमेंट येथे पोलिसांनी छापा टाकला. त्यावेळी या महिलेकडे सुमारे दोन कोटी रुपये किमतीचे मॅफेड्रॉन (एमडी) हे अमली पदार्थ आढळून आले. एडिका जोसेफ (३०) असे या महिलेचे नाव असून ती मूळची नायजेरियन देशाची नागरिक आहे. तिच्या व्हिजा ची मुदत संपली होती आणि ती भारतामध्ये बेकायदेशीररित्या राहत होती, असे तुळींज पोलिसांनी सांगितले. या महिलेला अटक केली असून तिच्या विरोधात गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५(एनडीपीएस ॲक्ट) कलम ८ (क), २१ (क) सह विदेशी नागरिक कायदा १९४६ चे कलम १४(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी सांगितले.

# विमानात बॅग ठेवण्यापूर्वी रसायनाने घेतला पेट, मोठी दुर्घटना टळली



**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी मोठी दुर्घटना टळली. विमानात ठेवण्याआधीच ज्वलनशील पदार्थ असलेल्या बॅगेने पेट घेतला. याप्रकरणी एका प्रवाशासह पाच जणांना अटक करण्यात आली असून सुरक्षेत कशी चूक झाली याबाबतचीही तपासणी सुरू आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बॅगेत हायड्रोजन स्पिरीट होते. रसायन असलेली बॅग तपासणीसाठी न्यायवैधक प्रयोगशाळेत पाठवण्यात आली आहे. कांगोमधील एका व्यक्तीने हे रसायन घेऊन येण्यास सांगितल्याचे आरोपीने चौकशीत कबुल केल्याची माहिती उपायुक्त (परिमंडळ-८) दिक्षित गेदाम यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून (टर्मिनल-२) शुक्रवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास इथोपियन एअरलाईन्सचे प्रवाशी विमान क्र. ईटी-६४१ अदिस अबाबा येथे जात होती. त्यावेळी प्रवासी समीर नारायण बिश्वास (३२) याने विमानात ठेवण्यासाठी जमा केलेल्या बॅगेने पेट घेतला. विमानात बॅग ठेवण्याआधीच बॅगेने पेट घेतल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. तात्काळ ही आग विझवण्यात आली. पण या घटनेमुळे एकच खळबळ उडाली. याबाबत तात्काळ पोलिसांना कळवण्यात आले. पोलिसांनी तात्काळ समीरला विमानातून उतरवून त्याची चौकशी केली. त्यावेळी त्याने साथीदार नवीन शर्मा, बिश्वभाई उर्फ विश्वनाथ बालासुब्रमनी सेंगुतर, नंदन यादव व अखिलेश यादव यांच्या मदतीने रसायन मिळवल्याचे सांगितले. पोलिसांनी तात्काळ या सर्वांना अटक केली. याप्रकरणी इथोपियन एअरलाईन्सचे व्यवस्थापक राकेश वाकळे यांच्या तक्रारीवरून सहार पोलिसांनी भारतीय न्याय सहिता कलम १२५, ३२७, ६१ (२) नागरी विमान वाहतूक कायदा कलम ३ (१) (क) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पश्चिम बंगाल येथील रहिवासी असलेला आरोपी समीर याला कांगोमध्ये व्यवस्थापकपदी नोकरी मिळाली होती. त्यामुळे तो इथोपियावरून कांगोला जाणार होता. कांगो येथील नवीन शर्मा याने मुंबईतून येताना एक बॅग आणण्यास सांगितली होती. अंधेरी पूर्व येथे राहणाऱ्या नंदन यादवने ती बॅग समीरला विमानतळाबाहेर सुपूर्त केली होती. चौकशीत नंदन यादवला आरोपी सुरेश सिंह याने ती बॅग दिली होती. सुरेशचा ए. एस. लॉजिस्टीक नावाने व्यवसाय असून अटक आरोपी विश्वनाथ सेंजुनधरने रसायन दिले होते. कांगो येथील आरोपी नवीन शर्मा याच्या सांगण्यावरून विश्वनाथने रसायन सुरेश सिंहला दिले होते. नंदन यादवला ज्वलनशील पदार्थ विमानतळापर्यंत नेण्यासाठी अखिलेश यादव (२८) याने मदत केली होती, अशी माहिती तपासात उघड झाली आहे. याप्रकरणी पाचही आरोपींना अटक करून शनिवारी न्यायालयापुढे हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणात कांगोत राहणाऱ्या नवीन शर्मा यालाही आरोपी करण्यात आले आहे. जगातील महत्त्वाच्या विमानतळांपैकी एक असलेल्या मुंबई विमानतळाच्या आत ज्वलनशील पदार्थ कसे गेले, याबाबतही पोलीस तपास करीत आहेत. त्याबाबत आरोपींची चौकशी करण्यात येणार असून सुरक्षा व्यवस्थेची तपासणी करण्यात येणार आहे. ट्रॉलीमधील बॅगेने पेट घेतला. त्यामुळे जीवितहानी झाली नाही. त्यावेळी विमानात सुमारे २०० प्रवासी बसले होते. आरोपी समीर स्वत: या विमानात बसला होता.

# औषध खरेदीची निविदा प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी, झीरो प्रिस्क्रिप्शन योजना सप्टेंबरपासून सुरु करण्याचे आदेश



**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये शून्य औषध चिठ्ठी योजना लागू करण्यासाठी औषध खरेदीशी संबंधित निविदा प्रक्रियेतील पडताळणी वेगाने पूर्ण करावी, यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ आणि अतिरिक्त संगणकांचा पुरवठा करावा, तसेच मोहीम स्वरूपात काम करून येत्या ६ सप्टेंबरपर्यंत पडताळणी प्रक्रिया पूर्ण करावी आणि कोणत्याही परिस्थितीत १५ सप्टेंबरपर्यंत कार्यादेश द्यावेत, असे सक्त निर्देश अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी मध्यवर्ती खरेदी खात्यासह रूग्णालय प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे ही योजना सप्टेंबरपासून सुरू होण्याची शक्यता आहे. महानगरपालिका रूग्णालयामध्ये औषधोपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना आवश्यक असणारी औषधे बाहेरील दुकानांमधून खरेदी करावी लागू नयेत, यासाठी शून्य औषध चिठ्ठी योजना अर्थात झिरो प्रिस्कीप्शन धोरण राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगरपालिका प्रशासनाला दिले होते. मात्र अद्याप ही योजना सुरू होऊ शकलेली नाही. आचारसंहिता, किचकट निविदा प्रक्रिया यामुळे ही योजना रखडली आहे. ही प्रक्रिया अधिक वेगाने होऊन नागरिकांना या धोरणाचा लाभ मिळावा, या उद्देशाने मुंबई महानगरपालिका प्रशासनाची एक महत्त्वपूर्ण बैठक बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी महानगरपालिका मुख्यालयात पार पडली. शून्य औषध चिठ्ठी योजना महापालिकेची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे रूग्णांना महापालिकेच्या रूग्णालयातच मोफत औषधे उपलब्ध होणार आहेत. यासाठी मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत सुरू असलेल्या निविदा प्रक्रियेत विविध सूचीअंतर्गत निरनिराळी औषधे व वैद्यकीय बाबींची पडताळणी प्रक्रिया सध्या मध्यवर्ती खरेदी खाते आणि बा. य. ल नायर रूग्णालय यांच्यामार्फत सुरू आहे. ही प्रक्रिया अधिक वेगाने होण्यासाठी आवश्यक असणारे वरिष्ठ फार्मासिस्ट, फार्मासिस्ट आणि डेटा एंट्री ऑपरेटर आदी अतिरिक्त मनुष्यबळ व या अतिरिक्त मनुष्यबळाला आवश्यक असणारे अतिरिक्त संगणक तातडीने म्हणजे पुढच्याच दोन दिवसात उपलब्ध करून देण्याचे आदेश बांगर यांनी बैठकीदरम्यान सह आयुक्त (मध्यवर्ती खरेदी खाते) विजय बालमवार, उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) संजय कुर्हाडे, संचालक (वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रूग्णालये) डॉ. नीलम अंद्राडे यांना दिले. सोमवार ते शनिवार दरम्यान मोहीम पद्धतीने अतिरिक्त मनुष्यबळ वापरून हे काम पूर्ण करावे आणि पथके नेमून कामांचा दररोज आढावा घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. या सर्व कार्यवाहीसाठी तीन आठवड्यांची मुदत अतिरिक्त आयुक्तांनी दिली आहे.

# मालकाने पगार न दिल्याने तीन तरुणींचे अजब कृत्य, पाण्याच्या बाटलीतून लघुशंका प्यायला दिल्याचा रचला बनाव



**वसई :** पगार मिळत नाही म्हणून अनेक लोक मालकाशी भांडतात. पगार मिळवण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या लढवतात. मात्र वसईतील एका कंपनीत काम करणाऱ्या तीन तरुणींनी एक अजब शक्कल लढवली होती. या तरुणींनी आपल्या पाण्याच्या बाटलीत मालकाने लघुशंका भरून दिल्याची तक्रार पोलीस ठाण्यात केली. सुरुवातीला पोलीस देखील या अजब आरोपाने चक्रावले होते मात्र पोलीस तपासात हा बनाव असल्याचे निष्पन्न झाले. वसई पूर्वेच्या नवघर येथे इमिटेशन ज्वेलरी बनाविन्याचा एक छोटा कारखाना आहे. या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या तीन तरुणींनी माणिकपूर पोलीस ठाण्यामध्ये एक अजब तक्रार दाखल केली. आमच्या पाण्याच्या बाटलीमध्ये कंपनी मालकाने लघुशंका केल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी या तक्रारीत केला होता. या विचित्र आरोपाने पोलीस देखील चक्रावले. पोलिसांनी लगेच कंपनीमध्ये चौकशी सुरू केली रात्रपाळीत काम करणाऱ्या सर्व कामगारांना आणले त्यांची कसून चौकशी सुरू केली. त्यांना पोलिसी भाषेत प्रसादही दिला मात्र कोणीच कबुली कबुली देईना. कंपनीत सीसीटीव्ही कॅमेरे देखील नव्हते त्यामुळे नेमका काय घडलं हे कळायला मार्ग नव्हता. इमिटेशन सगळा किळसवाणा प्रकार रात्री झोपायला आलेल्या कामगारांनीच केल्याचा आरोप या मुलींनी केला होता. याची तक्रार कंपनीच्या मालकाकडे केली असता त्या मालकाने उलट त्या मुलींवरच संशय घेतला होता. त्यानंतर संतापलेल्या त्या मुलींनी थेट वसईचं माणिकपूर पोलीस ठाणे गाठलं आणि आपली लेखी तक्रार पोलिसांना दिली. मात्र पोलिसांनी जेव्हा या मुलींची उलट तपासणी केली तेव्हा घडलेला प्रकार समोर आला. काहीही समोर येत नसल्याने मोठा पेच निर्माण झाला होता. अखेर पोलिसांना संशय आला आणि त्यांनी या तीन तरुणीची उलट चौकशी केली. तेव्हा त्यांनी हा बनाव रचल्याची बाब समोर आली. कंपनी मालकाने त्यांना पगार दिला नव्हता. हा रखडलेला पगार मिळावा आणि कंपनी मालकाला धडा शिकवावा यासाठी त्यांनी हा बनाव रचल्याचे माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने यांनी सांगितले. या तरुणींनी दिलेल्या तक्रारीचा आम्ही गांभीर्याने तपास केला. मात्र त्यात काही निष्पन्न झाले नाही. आम्ही या तरुणीने आज पुन्हा पोलीस ठाण्यात बोलून चौकशी करणार आहेत. त्यातून काय निष्पन्न होते का ते तपासले जाईल अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने यांनी दिली आहे.

# गरिबांवरील उपचारासाठी तीन कोटींचे एक वाहन


**मुंबई** : राज्यातील ग्रामीण, आदिवासी भागातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी फिरता दवाखाना सुरू करण्याची सार्वजनिक आरोग्य विभागाची योजना निव्वळ उधळपट्टी आहे. या फिरत्या दवाखान्यांसाठी आरोग्य विभागाने अडीच ते तीन कोटींचे एक अशी सुमारे ८० ते १०० आलिशान वाहने खरेदी करण्याचा घाट घातला आहे. राज्यातील ग्रामीण भागात पुरेशी आरोग्य व्यवस्था असताना महागड्या आलिशान वाहनांची गरज काय, असा आक्षेप वित्त विभागाने या प्रस्तावावर घेतला होता. त्यामुळे आता हा वाद मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात गेला आहे. विशेष म्हणजे, वाहन खरेदीच्या याच प्रस्तावावरून नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात शाब्दिक चकमक उडाल्याचे सांगण्यात येते. आषाढी वारीनिमित्त सार्वजनिक आरोग्य विभागाकडून गेल्या दोन वर्षांपासून आरोग्याची वारी पंढरीच्या दारी हा उपक्रम राबविला जातो. त्याअंतर्गत वारी मार्गावर दर पाच किमी अंतरावर आपला दवाखाना तयार करून वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरवली जाते. या योजनेची व्याप्ती वाढवून ग्रामीण, आदिवासी भागांतील नागरिकांवर उपचारासाठी फिरत्या दवाखान्याची योजना राबवण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे. मात्र, या योजनेसाठीच्या वाहन खरेदीचा प्रस्ताव वादात सापडला आहे. नागरिकांना त्यांच्या



गावात, पाड्यावर जाऊन उपचार सुविधा पुरवणाऱ्या या वाहनांमध्ये तपासणी आणि उपचारासाठी आवश्यक यंत्रणा तसेच औषधे यासोबतच डॉक्टर, रुग्णसेविका, मदतनीस आदी उपलब्ध असतील. मात्र, यातील एका वाहनाची किंमत अडीच ते तीन कोटी इतकी असून अशा १०० वाहनांच्या खरेदीवर जवळपास तीनशे कोटी खर्च करावे लागणार आहेत. तसेच हे फिरते दवाखाने चालवण्यासाठी वर्षाकाठी दीड हजार कोटींच्या आसपास खर्च अपेक्षित आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या खर्चाला नियोजन आणि वित्त विभागाने आक्षेप घेतला आहे. राज्यात सुमारे १० हजार उपकेंद्रे, दोन हजार प्राथमिक आरोग्य केंद्रे, २३ जिल्हा रुग्णालये, १०० खाटांची २५ उपजिल्हा रुग्णालये, ५० खाटांची ३२० ग्रामीण रुग्णालये याशिवाय फिरती वैदकीय पथके, आश्रमशाळा आरोग्य तपासणी पथके अशी व्यापक आरोग्य व्यवस्था असताना नव्या फिरत्या दवाखान्यांची गरज काय,असा वित्त विभागाचा आक्षेप आहे. तसेच इतकी महागडी वाहने कशासाठी, असा प्रश्नही या विभागाने विचारला आहे. यावरून आता दोन्ही विभागांत जुंपली असून त्यात हा प्रस्ताव अडकला आहे. वित्त विभागाच्या या आक्षेपानंतरही सार्वजनिक आरोग्य विभागाने हा प्रस्ताव पुन्हा एकदा वित्त विभागाच्या मान्यतेसाठी पाठवल्याचे समजते. मुख्यमंत्री आपत्तकालीन निधीत करोना काळातील ६०० कोटी रुपये शिल्लक असून तो निधी वाहने खारेदीसाठी तर योजनेवरचा खर्च दरवर्षी वित्तीय तरतूदीतून भागविण्याची भूमिका या प्रस्तावात घेण्यात आली आहे. ख्या प्रस्तावावरून वित्त आणि आरोग्य विभागात गेल्या काही दिवसांपासून सुंदोपसुंदी सुरू असून त्याचे पडसाद नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत उमटले होते. आरोग्य विभागाने थेट मुख्यमंत्र्याकडे दाद मागितल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात यावरून खडाजंगी झाल्याची चर्चा सध्या मंत्रालयीन वर्तुळात आहे.

# बदलापुरात तीन वर्षांच्या दोन मुलींवर शाळेतच अत्याचार ; आरोपी अटकेत

**बदलापूर** : बदलापूर शहरातील पूर्वेत असलेल्या एका नामांकीत शाळेत अवघ्या तीन वर्षांच्या दोन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पालकांच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी शाळा आणि पोलिसात धाव घेतली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यास मोठा वेळ घेतल्याने पालकांत संतापाचे वातावरण आहे. याप्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे. मात्र या प्रकारानंतर शाळेतील पालककांच्या मनात भितीचे वातावरण



आहे. बदलापूर पूर्वेतील एक नामांकीत शैक्षणिक संस्थेत हा प्रकार घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. शाळेतील छोट्या शिशु वर्गात शिकणाऱ्या तीन वर्षाच्या दोन मुलींसोबत हा प्रसंग घडला. एका मुलीने आपल्या पाल्यांना शाळेतील दादा नावाने परिचीत असलेल्या एका व्यक्तीने आपल्या गुप्तांगाला हात लावल्याची माहिती दिली. त्यानंतर पालकांनी त्या मुलीच्या वर्गातील दुसऱ्या मुलीच्या पालकांना याबाबत कळवले. त्यांना संशय आल्याने त्यांनी आपल्या मुलीला बदलापूर पूर्वेतील एका रूग्णालयात तपासणीसाठी नेले. या तपासणीनंतर रूग्णालयाने त्यांना अत्याचार झाल्याबाबत दुजोरा दिला. त्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी आणि पालकांनी पोलीस ठाण्यात धाव घेत याबाबत तक्रार दिली. मात्र बदलापूर पूर्व पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात मोठा वेळ घेतल्याचा आरोप पालकांनी केला आहे. अखेर याप्रकरणी १६ ऑगस्ट रोजी रात्री दहाच्या सुमारास अनोळखी इसमाविरूद्ध गुन्हा दाखल केला. भारतीय न्याय संहिता आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियमान्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारानंतर शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये संतापाचे आणि भीतीचे वातावरण आहे. याप्रकरणी अंबरनाथचे सहायक पोलीस आयुक्त सुरेश वरडे यांना संपर्क केला असता, आरोपीला ताब्यात घेतले असून चौकशी सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. आरोपी हा शाळेतीलच सफाई कर्मचारी असल्याचेही वरडे यांनी सांगितले आहे.

# धर्मांतराविरूद्ध उल्हासनगरात मोर्चा, मराठी मुलीच्या धर्मांतर प्रकरणानंतर संघटना एकटवल्या


**उल्हासनगर** : उल्हासनगरात झालेल्या हिंदू धर्मांतराच्या घटनेनंतर शनिवारी सकल हिंदू समाजाच्या वतीने शहरात भव्य मोर्चा काढण्यात आला. कैलास कॉलनी, समता नगर येथून तहसीलदार कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. मोर्चात हिंदू धर्मांतराच्या घटनांविरोधात तीव्र निषेध नोंदवण्यात आला. आमदार नितेश राणे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघाला. काही महिन्यांपूर्वी कुर्ला कॅम्प येथे राहणाऱ्या कल्पना चौधरी यांची मुलगी दृष्टी चौधरी हिने धर्मांतर केल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणात बनावट कागदपत्रे सादर करत धर्मांतर केल्याचा आणि फूस लावल्याचा आरोप कुटुंबियांनी केला




होता. त्यामुळे विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दृष्ठी चौधरी आणि सलीम चौधरी अशा दोघांना अटक केली होती. या घटनेनंतर शहरात संतापाचे वातावरण होते. त्यामुळे या प्रकरणाचा निषेध करण्यासाठी शनिवारी उल्हासनगरात जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चापूर्वी आमदार नितेश राणे यांनी कल्पना चौधरी आणि त्यांच्या परिवाराची भेट घेऊन समतानगर परिसरातील धर्मांतर प्रकरणाची माहिती घेतली. त्यानंतर उल्हासनगर तहसिल कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला. तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात हिंदू संघटनांनी धर्मांतरासंबंधी विविध मुद्द्यांवर कारवाईची मागणी केली. स्थानिक पोलीस आणि उल्हासनगर महानगरपालिका विशिष्ट समुदायाच्या बेकायदेशीर कारवायांवर कारवाई करण्यात उदासीन असल्याचा आरोप यावेळी राणे यांनी केला. अनेक बेकायदेशीर घरे भाड्याने देण्यात आली आहेत. जिथे अनधिकृतरित्या लोक राहतात. या भागातील हिंदू तरुणांचे आणि तरुणीचे जबरदस्तीने धर्मांतर केले जात आहे, असेही राणे म्हणाले. या प्रकरणाचा तपास आता दहशतवादी विरोधी पथकाकडे गेला असला तरी आम्ही आमच्या बहिणीला वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, असे राणे यावेळी म्हणाले.

# आई मद्यधुंद अवस्थेत असताना पित्याकडून १३ वर्षांच्या मुलीवर अत्याचार

**मुंबई** : आई मद्यधुंद अवस्थेत असताना पित्याने १३ वर्षांच्या मुलीवर अत्याचार केल्याचा खळबळजनक प्रकार मुंबईत घडला. पीडित मुलीने हा प्रकार मावशीला सांगितल्यानंतर तिने पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी पीडित मुलीच्या वडिलांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मुंबईमधील पश्चिम उपनगरात कुटुंबासमवेत वास्तव्यास असलेल्या १३ वर्षांच्या मुलीवर वडिलांनीच २७ जुलै रोजी अत्याचार



केला. आरोपीने पत्नीला दारू पाजली. दारू सेवनामुळे तिची शुद्ध हरपली. त्यानंतर पित्याने पीडित मुलीवर अत्याचार केला. त्यानंतर आरोपीने पीडित मुलीला हा प्रकार कोणालाही सांगितल्यास ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे मुलगी घाबरली होती. पण पीडित मुलीने काही दिवसानंतर तिच्या मावशीला घडलेला प्रकार सांगितला. मावशीने याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी याप्रकरणी बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्याअंतर्गत (पोक्सो) आरोपी पित्याविरोधात गुन्हा दाखल केला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# ज्या दिवशी सत्ता जाईल, त्या दिवशी :, मुख्यमंत्री शिंदेंवर ठाकरे गटाचा हल्लाबोल

**मुंबई** : आगामी विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांवर येऊन ठेपली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राजकीय नेत्यांनी कंबर कसली असून महाराष्ट्रात अनेक नेत्यांचे दौरे सुरु आहेत. या दौऱ्यादरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप- प्रत्यारोप सुरु आहेत. अशातच आज शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. मुख्यमंत्री हे लोचट मजनू आहेत. दिल्लीच्या दारातील एवढे लोचट मुख्यमंत्री आजपर्यंत आम्ही पाहिले नाहीत. मात्र, ज्या दिवशी त्यांची सत्ता जाईल, त्या दिवशी दिल्ली त्यांना पायाशीही उभं करणार नाही, असा हल्लाबोल खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर केला. महाराष्ट्रात महाविकास आघाडीला लोकसभेला चांगलं यश मिळालं. आता विधानसभेची तयारी सुरु आहे. बुलढाण्यात होतो. आज अकोल्यात आहे. या राज्यातील वातावरण असं आहे की कोणत्याही परिस्थितीत



राज्यात सत्ताबदल होईल. हे सरकार सध्या राज्याच्या तिजोरीमधून किती उधळपट्टी करत आहे? लाडक्या बहिणींना पैसे मिळाले पाहिजेत. त्यांचा १५०० रुपयांचा आकडा आहे. मात्र, पुढे जर आमचं सरकार आलं तर त्यामध्ये भरघोष वाढ होईल, असं सूचक विधान संजय राऊत यांनी केलं. लोकसभा निवडणुकीत आलेल्या अपयशानंतर महायुतीला लाडक्या बहिणींची आठवण झाली. मात्र, तोपर्यंत फक्त फुटलेले लाडके आमदार आणि फुटलेले लाडके खासदार या पलिकडे यांचं लाडकं कोणीही नव्हतं. एका-एका आमदाराला ५०-५० कोटी आणि एका-एका खासदाराला १०० कोटी देण्यात आले. ठाकरे गटाचे पदाधिकारी फोडण्यासाठी आताही कोट्यवधी रुपये खर्च होत आहेत. पण लाडक्या बहिणींसाठी १५०० रुपये देण्यात येत आहेत. यावरही चर्चा होईल. निवडणुकीनंतर नोव्हेंबरमध्ये राज्यात सत्तांतर झालेलं दिसेल. त्यासाठी महाविकास आघाडी मजबूतीने काम करत आहे. महाविकास आघाडीचे तीनही पक्ष एकत्र आहेत. पैसा आणि सत्ता यापुढे महाराष्ट्र झुकणार नाही, असा हल्लाबोल संजय राऊतांनी केला. आमच्या नितीन देशमुखांना सातत्याने त्रास दिला जात आहे. हा त्रास का दिला जात आहे? तर बेहिशोबी मालमत्ता असल्याचा आरोप केला जात आहे. मग तुमचं काय चाललंय? आमचे आमदार असतील, किंवा आमचे पदाधिकारी असतील आमच्या चौकशा तुम्ही करता का? मात्र, जेव्हा तुमची चौकशी आम्ही करू, तेव्हा तुम्ही सुटणार नाहीत, एवढंच सांगतो, असा इशारा खासदार संजय राऊत यांनी दिला. महाराष्ट्रात सावत्र भाऊ कोणीही नाही. जे सावत्र भाऊ असतील ते दिल्लीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह हे महाराष्ट्राला सावत्र वागणूक देत आहेत. महाराष्ट्राचे सावत्र भाऊ नाहीत तर ते भाऊच नाहीत. देवेंद्र फडणवीस, नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी महाराष्ट्राचं नुकसान केलं आहे. त्यांनी जेवढं नुकसान केलं तेवढं गेल्या १०० वर्षांत कोणीही केलं नाही. आताचे मुख्यमंत्री हे लोचट मजनू आहेत. दिल्लीच्या दारातील एवढे लोचट मुख्यमंत्री आम्ही आजपर्यंत पाहिले नाहीत. याआधी दिल्लीपुढे झुकणारे अनेक मुख्यमंत्री पाहिले. मात्र, यांच्याएवढा दिल्लीपुढे झुकणारा मुख्यमंत्री पाहिला नाही.

# केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक स्थापन, नवी मुंबईतील अतिक्रमणांवरील कारवाईतील टाळाटाळ रोखली जाणार

**नवी मुंबई** : शहरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले असून त्यावरील कारवाईत टाळाटाळ केली जात असल्याचे निदर्शनास आले. तसेच फेरीवाल्यांना कारवाईचा आधीच सुगावा लागत असल्याने अडचणी येतात. परंतु, आता पालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार सात जणांचे मुख्यालय स्तरावर केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक निर्माण केले आहे. नवी मुंबई महापालिकेच्या आठ विभाग अधिकाऱ्यांना शहरातील कोणत्याही विभागात केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक त्या ठिकाणी कारवाईचे आदेश देईल तेथे कारवाई करावी लागणार असून त्यामुळे अतिक्रमणविरोधी कारवाईत पारदर्शकता येणार आहे. उच्च न्यायालयाने ३१ डिसेंबर २०१५ आधीची आणि नंतरची किती




बेकायदा बांधकामे उभी राहिली आहेत याचे सर्वेक्षण करा तसेच २०१५ सालानंतरच्या बेकायदा बांधकामांवर कायद्यानुसार कारवाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने यापूर्वीच नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत. नवी मुंबईत सुमारे चार हजारांच्या वर अनधिकृत बांधकामे आहेत. आता मुख्यालय स्तरावरच केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक निर्माण केल्याने आता शहरात कारवाईचा सपाटा पाहायला मिळणार असून लागेबांधे निर्माण झाल्याने कारवाईत होणारी टाळाटाळ संपुष्टात येणार आहे. विभाग कार्यालयातील फेरीवाल्यांच्या कारवाईसाठी जाणाऱ्या पथकातील काही जणांचे हितसंबंध निर्माण होऊन अतिक्रमण पथक पोहोचण्याआधीच फेरीवाले तिथून जात असल्याचे पाहायला मिळत होते. आता कोणत्याही विभागातील कारवाईसाठीचे तात्काळ निर्देश मिळणार असल्याने छुपी सौदेबाजी तसेच कारवाईतील टाळाटाळ रोखली जाणार आहे. शहरात अनधिकृत बेकायदा बहुमजली इमारतींची संख्याही मोठी आहे. पालिका फक्त नोटीस बजावून संबंधित सदनिका अनधिकृत असून या ठिकाणी नागरिकांनी सदनिका खरेदी करू नये असे आवाहन करते. याच अनधिकृत बांधकामांकडे केलेल्या दुर्लक्षामुळे हजारो नागरिकांची फसवणूक होत आहे, आता त्यावर अंकुश येणार आहे. पालिका अधिकाऱ्यांकडून अतिक्रमणाबाबत काणाडोळा केला जात होता. अनेक विभागांत वर्षानुवर्षे तेच तेच अधिकारी अतिक्रमण विभागावर ठाण मांडून बसल्यामुळे अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जात नव्हती, आता त्याला आळा बसणार आहे.

# वाढदिवसासाठी गेलेल्या अल्पवयीन मुलीचे अज्ञाताकडून अपहरण

**डोंबिवली** : वाढदिवसासाठी सोमवारी संध्याकाळी घरातून बाहेर पडलेल्या डोंबिवली पश्चिमेतील जुनी डोंबिवलीतील एका १६ वर्षाच्या मुलीचे अज्ञाताने अपहरण केले असल्याची तक्रार या मुलीच्या आईने विष्णुनगर पोलीस ठाण्यात केली आहे. मुळ सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील असलेले हे कुटुंब नोकरीनिमित्त डोंबिवलीत राहत आहे. सोमवारी संध्याकाळी साडे सहा ते सात वाजण्याच्या दरम्यान हा अपहरणाचा प्रकार घडला आहे.




पोलिसांनी सांगितले, अपहृत मुलीच्या मैत्रिणीचा सोमवारी वाढदिवस होता. सोमवारी संध्याकाळी मैत्रिणीने वाढदिवसानिमित्त घरी मेजवानी ठेवली होती. या कार्यक्रमासाठी अपहृत मुलगी जुनी डोंबिवलीतील भारत माता शाळेजवळील आपल्या घरातून संध्याकाळी साडे सहा वाजता निघाली. वाढदिवस असलेली तिची मैत्रिण सम्राट चौकात राहते. मुलगी वाढदिवस कार्यक्रमासाठी गेली आहे म्हणून अपहृत मुलीचे आई, वडील निश्चिंत होते. रात्रीचे दहा वाजून गेले तरी मुलगी घरी येत नाही म्हणून अपहृत मुलीच्या आईने वाढदिवस असलेल्या मैत्रिणीला संपर्क केला. तेव्हा तिने तुमची मुलगी वाढदिवसासाठी आली नसल्याचे सांगितले. हे बोलणे ऐकून अपहृत मुलीच्या आई, वडिलांना धक्का बसला. त्यांनी मुलगी संध्याकाळी साडे सहा वाजता घरातून बाहेर पडली आहे, असे सांगितले. अपहृत मुलीच्या आई, वडील, वाढदिवस असलेल्या मैत्रिणीच्या कुटुंबीयांनी अपहृत मुलीचा डोंबिवली परिसरात तात्काळ शोध सुरू केला. ती उद्यान, बगिचा कोठे किंवा रेल्वे स्थानक भागातही आढळून आली नाही. त्यामुळे कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून आपल्या मुलीस पळून नेले असावे म्हणून अपहृत मुलीच्या आईने विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.□ विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार यांनी या अपहरण प्रकरणी तपास पथके तयार करून मुलीचा शोध सुरू केला आहे. जुनी डोंबिवली भागातील सीसीटीव्ही चित्रण तपासून, तांत्रिक माहितीच्या आधारे पोलीस अपहृत मुलीचा शोध घेत आहेत.

# दुचाकीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू, नागले येथे दोन दुचाकींची समोरासमोर धडक

**वसई** : वसई पूर्वेच्या नागले येथे दोन दुचाकी वाहनांची समोरासमोर झालेल्या धडकेत तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. हितेश मुकादम (३२) असे या तरुणाचे नाव आहे. हितेश मुकादम हा नागले गावातील रहिवासी असून तो आई वडील,



पत्नी यांच्या सोबत राहत होता. तीन वर्षापूर्वीचा त्याचा विवाह झाला होता. गुरुवारी सायंकाळी चारच्या वाजता कामण भिवंडी रोडवरून स्कुटीवरून प्रवास करत होता. परंतु नागले गावाजवळ रेल्वेच्या वाहिन्या टाकण्याचे काम सुरू असल्याने एक मार्गिकेवरून वाहतूक सुरू होती. याच दरम्यान आर वन ५ व स्कुटी या दोन वाहनांची समोरासमोर धडक लागून अपघात घडला. या अपघातात हितेश याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घडलेल्या अपघाताची पोलिसांनी सखोल चौकशी करावी अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे. आधीच कामण भिवंडी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यातच वसई दिवा मार्गिकेवर नवीन रेल्वे वाहिन्या अंथरण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे येथील रस्ता अरुंद झाला असून एकाच मार्गावरून वाहतूक सुरू आहे. या ठिकाणी कामाच्याबाबत व सुरक्षेसाठी कोणतेच सूचना फलक न लागल्याने अपघात घडला असल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे.

## संपादकीय

संपादक : अनिल राजाराम पवार

# झोपडपट्टीमुक्तीच्या वल्गना

माणसाला नेमकी किती जमीन लागते ? ही लिओ टॉलस्टॉयची लघुकथा प्रसिद्ध आहे. सुमारे दीडशे वर्षानंतरही या कथेचे सार आणि प्रश्नाचे मर्म आपल्याला उमगलेले नाही. त्याचप्रमाणे मुंबईसारखी शहरे झोपडपट्टीपासून मुक्त होण्यासाठी नेमकी किती जमीन लागेल, बिल्डरांना किती भूखंड लागेल आणि राजकारणी–नोकरशाही यांना जमिनींच्या विकासापोटी किती मलिदा द्यावा लागेल, या प्रश्नांची उत्तरेही आज कुणाला ठाऊक नाहीत. मुंबई शहर झोपडपट्टीमुक्त करण्याची आणि त्यासाठी बिल्डरांना जमीन आंदण देऊन त्यांच्यामार्फत ४० लाख झोपडीवासियांना मोफत घरे देण्याची योजना १९९५ साली घोषित करण्यात आली. त्यास आता तीन दशके उलटूनही झोपडीमुक्त मुंबईची घोषणा ही केवळ वल्गनाच ठरली आहे. सर्वोच्च न्यायालयाने या योजनेतील सावळागोंधळाची गांभीर्याने दखल घेतली असून मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठास मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसनाची झाडाझडती घेण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र झोपडपट्टी सुधार, निर्मूलन व पुनर्बांधणी हा कायदा १९७१ पासून राज्यात अस्तित्वात आहे. मुंबई उच्च न्यायालयातर्फे आता या कायद्याची अंमलबजावणी नेमकी किती प्रभावीपणे झाली आहे, त्यातून काय साध्य झाले आहे व त्यात किती गैरप्रकार झाले आहेत, याची तपासणी होणार आहे. खरे तर गेल्या ५० वर्षांत झोपडपट्टी सुधार आणि निर्मूलन याबाबत काय झाले, याचा वेळोवेळी आलेल्या सरकारांनी आढावा घेण्याची गरज होती. ते काम न्यायालयाला हाती घ्यावे लागत आहे, यासारखी शरमेची गोष्ट नाही. कोणत्याच सरकारला किंवा गृहनिर्माण विभाग, सनदी अधिकारी यांनाही अशी गरजच कधी वाटली नाही, याचे कारण उघड आहे. झोपडपट्ट्यांकडे गोरगरिबांच्या निवाऱ्यापेक्षा मतपेट्या म्हणूनच राजकारण्यांनी कायम पाहिले. झोपडीवासियांना पर्यायी घरे देतांना नव्याने झोपड्या उभ्या राहू नयेत, यासाठी १९९५ पर्यंतच्या झोपड्या अधिकृत मानण्याची मर्यादाही ठेवण्यात आली होती. मात्र, लोकप्रतिनिधींच्या रेट्यातून ही मर्यादा २००० सालापर्यंत वाढली. १४ फुटांपर्यंत झोपड्यांना परवानगी देण्याची धोरणे सभागृहांमध्ये मंजूर होते, तेव्हा प्रत्यक्षात झोपड्यांची उंची मात्र त्यापेक्षा तिप्पट झालेली असायची. काही ठिकाणी व्यापारी धंदे चालायचे. मात्र, महापालिका, जिल्हाधिकारी तसेच केंद्र सरकारचे विविध विभाग, ज्यांचे ज्यांचे भूखंड झोपड्यांनी व्यापले होते, त्यांच्या यंत्रणांनी या गोष्टींकडे पूर्णत: डोळेझाक केली. झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी मध्यस्थ म्हणून स्थानिक राजकीय गुंडापुंडांची नवी फळी उदयास आली. गटातटांमध्ये समेट घडवून इच्छुक बिल्डरला शिरकाव करून देण्याची गुरूकिल्ली या लोकांकडे होती. हेच पुढे प्रवर्तक, विकासक म्हणून मिरवू लागले. आलिशान मोटारींनी त्यांचे फॉर्च्युन फळफळले, परंतु झोपडीवासियांचे व शहराचे राहणीमान काही सुधारले नाही. २०११ मधील जनगणनेनुसारही मुंबईतील २४ टक्के भूभाग झोपड्यांनी व्यापलेला होता आणि सुमारे ४८ टक्के जनता झोपड्यांमध्ये राहात होती. एसआरएच्या इमारती ही राहणीमानाच्या दृष्टीनेही दूषणेच ठरली. कधी बिल्डरने कॉर्पस बुडविला म्हणून तर कधी रहिवाशांनी मासिक हिस्सा थकविला म्हणून, या इमारतींची लिफ्ट बंद असणे, वीज कापली जाणे, पाण्याचा खडखडाट अशी परिस्थिती रहिवाशांवर आली. कित्येक प्रकल्प वीस वीस वर्षे केवळ रखडलेले व रहिवासी संक्रमण शिबिरांमध्ये खितपत पडलेले. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ही यंत्रणा तर एक नवे कुरण ठरली. पुनर्विकसित इमारतीत घरे मिळाल्यावर दहा वर्षे ते विकता येणार नाही, ही अट झोपडीवासियांना मोफत घरे देतांना होती. मात्र त्यास कित्येक ठिकाणी हरताळ फासण्यात आला. घरे विकून लोक पुन्हा झोपडीत गेले. या प्रकारांवर उच्च न्यायालयाने अनेकदा कोरडे ओढले. परंतु सरकारांनी या हस्तांतरणाच्या अटी काढण्याचाच कल दाखविला. म्हणजे झोपड्यानिर्मूलनाच्या हेतूलाच हरताळ फासला गेला. गोरगरीब व कष्टकऱ्यांना स्वस्तात छप्पर मिळाले पाहिजे, हा उद्देश योग्यच. शिवाय, टोलेजंग गगनचुंबी टॉवरना भूखंड देऊन त्याबदल्यात त्यांनी गरिबांसाठी मोफत घरे बांधणे हे आवश्यकही ठरते. परंतु याचा अर्थ टॉवरवाल्यांनी झोपड्यांच्या जिवावर कमवायचे, झोपडीदादांनी हतबल कष्टकऱ्यांच्या आणि अतिक्रमितांनी करदात्यांच्या, असाही होत नाही. या प्रकारांना आळा बसायला हवा. जे मॉडेल मुंबईत राबविले जाते, तेच राज्यभर अस्तित्वात येते. जगातील सर्वांत मोठी झोपडपट्टी आमच्याकडे, असा टेंभा आपण किती काळ मिरवत राहायचा ? विदेशातील पर्यटकांचे झोपडपट्टी पर्यटन हेच आपले आकर्षण ठरणे भूषणावह नाही. प्रत्येक निवडणुकीत आजही झोपडीमुक्त मुंबई ही घोषणा द्यावी लागते, हे नगरसेवकांपासून खासदारांपर्यंत आणि सनदी–सरकारी अधिकारी, पोलिस या सर्वांचे अपयश आहे. न्यायालयाच्या दणक्याने तरी या बजबजपुरीतून मुंबापुरीची सुटका व्हावी.

# भारतीय रेल्वेचा इतिहास, तरी पण कोल्हापूर ग्रामीण भाग रेल्वेपासून वंचितच !!


१६ एप्रिल १८५३ या दिवशी लॉर्ड एल्फिन्स्टन यांनी बोरीबंदर त्या काळच्या लाकडी स्थानकावर उभ्या असलेल्या वाफेच्या इंजिनचा आणि त्यामागे काढलेल्या चौदा डब्यांच्या गाडीला एकवीस तोफांची सलामी देऊन पुढे निघण्यास आदेश दिला.त्याच बरोबर दुपारी ३ वाजून ३५ मिनिटांनी भारतातील पहिली रेल्वे धूर सोडत भायखळयापर्यंत न थांबता निघाली. या गाडीचा पहिला प्रवास अनुभवण्यासाठी चारशे निमंत्रितांना बोलाविण्यात आले होते. त्यांना गाडीच्या चौदा डब्यात बसवण्यात आले. तीन लहान वाफेची इंजिन या गाडीला जोडण्यात आली. ताशी अवघ्या पंचवीस किमी वेगाने, वाफेच्या इंजिनमध्ये पाणी भरण्यासाठी बारा थांबे घेत एक तास वीस मिनिटांनी ही गाडी चौतीस किमी. अंतर कापत ठाणे स्थानकात पोहोचली. त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली होती. १९८३ मध्ये मुंबईचे आद्यजनक शिल्पकार नाना शंकर शेठ, भारताचे लोहपुरुष सर जमशेदजी जीजीभाई यांच्या प्रयत्नाने ग्रेट इंडियन रेल्वे कंपनीची स्थापना केली, वास्तू शिल्पकार एफ डब्ल्यू स्टीवेन्सन यांनी १८७७ साली बोरीबंदर स्थानक उभारणीच्या कामास सुरुवात केली व १ जानेवारी १९२५ रोजी लोकांसाठी खुले करण्यात आले.प्रत्यक्षात १८८७ रोजी काम पूर्ण झाले होते. ज्युबिली डे ला १९८८ साली बोरीबंदरचे नांव व्हिक्टोरिया टर्मिनल असे ठेवण्यात आले. यास आता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल असे ठेवण्यात आले आहे. मुंबई आणि दिल्ली यांना जोडणा या पहिल्या राजधानी एक्सप्रेसचे उद्घाटन १७ मे १९७२ रोजी पार पडले. भारत देशात ब्रिटीशांची सत्ता असताना मुंबईचे आद्यजनक शिल्पकार नानाशंकर शेठ व सर जमशेदजी जीजीभाई यांनी ग्रेट इंडिया रेल्वे कंपनीची स्थापना करुन रेल्वेचा इतिहास घडवला. त्याच बरोबर मुंबईचा विकासही झाला, त्याचप्रमाणे कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी जातीभेद न ठेवता कोल्हापूर मधील मागासवर्गीयांपासून ते इतर जातीधर्मातील मुलामुलींना शिक्षणापासून वंचित न ठेवता सर्वांना शिक्षण मिळेल अशी तजवीज केली, समाजकार्य केले. तसेच १८९० साली स्वत:च्या पैशांनी कोल्हापूर ते मिरज रेल्वे सुरु केली. कोल्हापूरची जनता त्यांचं कार्य विसरुच शकत नाही. असे असताना छत्रपती शाहू महाराजांच्या जिल्हयातील ग्रामीण भाग रेल्वेसेवेपासून वंचित राहिला. १९७० साली बेळगांव व्हायाचंदगड ते सावंतवाडी या रेल्वे मार्गाचा दक्षिण मध्य झोन कडून पहिला सर्वे झाला. चंदगड तालुका कर्नाटक, कोकण, गोव्याच्या त्रिवेणी संगमावर असून उत्तर कर्नाटक, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावणारा हा रेल्वेमार्ग आहे. बेळगांव, कुद्रेमनी, माडवळे, हलकर्णी, नागणवाडी, चंदगड, कानूर, आंबोली मार्गे सावंतवाडी १९७० साली रेल्वेने सर्वे करुन उभे केलेले ठडीमार्करठ आजही उभे आहेत. विशेष म्हणजे कुद्रेमनी ते माडवळे दरम्यान एकाही शेतकऱ्याने सर्वे करुन डीमार्कर केलेली जागा (जमिन) अधिग्रहण केलेली नाही.हे शेतकरी रेल्वेच्या प्रतिक्षेत आजही आहेत. दक्षिण/मध्य झोन रेल्वेचे मुख्य अभियंता श्री.राम गोपाल यांनी २१ सप्टेंबर २०१८ रोजी पुन्हा सर्वे करुन केंद्रीय रेल्वे मंत्रालयाला अहवाल सादर केलेला आहे. भारतीय रेल्वेचे एकूण १८ झोन आणि ७० विभाग आहेत. पूर्व किनारा रेल्वे झोनची स्थापना ८ ऑगस्ट १९९६ रोजी करण्यात आली, पश्चिम मध्य रेल्वे झोनची स्थापना ९ डिसेंबर १९९६ रोजी करण्यात आली, दक्षिण पश्चिम रेल्वे झोनची स्थापना १ नोव्हेंबर १९९६ रोजी करण्यात आली. उत्तर पश्चिम रेल्वे झोनची स्थापना १० ऑक्टोबर १९९६ रोजी करण्यात आली. प्रत्येक विभागाचे नेतृत्व डीआरएम (विभागीय रेल्वे व्यवस्थापक) करतात. दक्षिण पश्चिम रेल्वे झोनचे मुख्य व्यवस्थापक राम गोपाल यांनी २१ सप्टेंबर २०१८ रोजी सर्वे करुन अहवाल सादर केला आहे. हे जरी खरे असले तरी कोल्हापूरचे लोकप्रतिनिधी यांनी त्याचा पाठपुरावा न केल्यामुळे रेल्वेमंत्र्यांनी आणि रेल्वे प्रशासनाने दुर्लक्षित केल्याने हा रेल्वेमार्ग रखडलेला आहे. दक्षिण पश्चिम रेल्वे झोन कडून सादर झालेला सर्वे अहवाल आणि सध्या स्थित असलेले डिमार्कर लक्षात घेऊन रेल्वेमंत्रालयाने छत्रपती शाहू महाराज यांच्या जिल्हयातील ग्रामीण भाग रेल्वेच्या सोईपासून वंचित ठेऊ नये.



नामदेव कृष्णा पाटील
बी.कॉम.कांदिवली (पूर्व), मुंबई.

### कोल्हापूर चंदगड नवीन रेल्वेमार्ग

बेळगांव,चंदगड व्हाया सावंतवाडी आणि कोल्हापूर, कागल, निपाणी, गडहिंग्लज, आजरा, महागांव, नेसरी, अडकूर ते चंदगड असा प्रस्तावित नविन रेल्वेमार्गाचे सर्वे करुन लवकरात लवकर रेल्वेमार्गाचे काम चालु करावे. मुंबई पश्चिम उपनगर ते विरार पर्यंत, सातारा, कराड, सांगली, कोल्हापूर, आजरा, गडहिंग्लज, बेळगांव, महाराष्ट्र/कर्नाटक सीमा भागातील जनता आपल्या जन्मभूमीची नाळ न तोडता नोकरीधंदया-निमित्ताने वास्तव्यास आहेत. पश्चिम उपनगरातील सामाजिक संघटनांनी अभ्यास करुन, कोल्हापूर जिल्हा राजर्षि शाहू महाराज उत्कर्ष सेवा संघ, अमर प्रतिष्ठान, कांदिवली (पूर्व), कोल्हापूर जिल्हा जनकल्याण संस्था यांच्या मार्फत एस.टी. महामंडळ, बसेस नसल्यामुळे, खाजगी बसमालकांची पिळवणूक व परिवहन मंत्रालय व खाजगी बसमालक यांच्या संगनमताने ब-याच अंशी महामंडळाच्या बसेस कमी केल्यामुळे सामान्य जनतेला नाहक त्रास सहन करावा लागतो. अशी समाजातून कायम ओरड होत आहे हे जाणून वरील संस्थांनी रेल्वे मंत्रालयाकडे बोरीवली मतदार संघाचे खासदार मा.श्री.पीयूष गोयल साहेब यांनी सदर प्रकरणी लक्ष घालून कोल्हापूर व बेळगांव सीमा भागातील पश्चिम उपनगरात वास्तव्यास असलेल्या जनतेचा प्रश्न मार्गी लावून




छत्रपती शाहू महाराज एक्सप्रेस चालु करावी. बोरीवली मतदार संघातील माजी खासदार गोपाळ शेट्टी यांच्यामार्फत रेल्वेमंत्री यांना हाच प्रस्ताव सादर केला आहे. मात्र केंद्रसरकार व रेल्वे प्रशासन यांचे सदर प्रस्तावाकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केलेले आहे. छत्रपती शाहू महाराज यांच्या जिल्हयातील ग्रामीण भाग रेल्वे सुविधांपासून वंचित राहिलेला आहे. बेळगांव व्हाया चंदगड, सावंतवाडी आणि कोल्हापूर, कागल, निपाणी, गडहिंग्लज, आपजरा, महागांव व नेसरी, अडकूर ते चंदगड अशा नियोजित रेल्वेमार्गामुळे ग्रामीण शेतकऱ्यांना दळणवळण सेवा माफक दरात मिळत असेल तर शेतात काय पिकतं त्यापेक्षा बाजारात काय विकलं जातं याची जाण नक्कीच कोल्हापूरच्या शेतक-यांना आहे. बेळगांव जरी मराठी आणि कानडी भाषेची पेटती भट्टी जरी असली तरी बेळगांव आणि सीमाभागातील सगेसोयरे नातलग मोठया प्रमाणात बेळगांवातच आहेत. चंदगड तालुक्यातील आर्मी जवान सेवानिवृत्तीनंतर वास्तव्यास बेळगांवातच आहेत. बेळगांव व्हाया चंदगड, सावंतवाडी आणि कोल्हापूर, चंदगड असा रेल्वेचा संगम झाल्यामुळे कर्नाटक व महाराष्ट्र यांचे संबंध अधिक धाग्यासारखे मजबून होतील यात शंका नाही. कोल्हापूर जिल्हा रहिवाशी प्रवासी संघटनेच्या माध्यमातून सदर विषयाचा पाठपुरावा करण्यात येत असून लोकप्रतिनिधी यांच्या मार्फत बांद्रा, बोरीवली, वसई, पनवेल, पुणे, सातारा, कराड, सांगली, कोल्हापूर ते बेळगांव पर्यंत ठ छत्रपती शाहू महाराज एक्सप्रेस ठ चालु करण्याबाबत सातत्याने पाठपुरावा २०१४ पासून करण्यात येत आहे. पण सत्तेत असणाऱ्या सरकारने अद्याप या प्रश्नाकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे पश्चिम उपनगरात नोकरी निमित्ताने वास्तव्यास असलेल्या जनतेला खाजगी बसमालकांचा त्रास सहन करुन प्रवास सणासुदीसाठी करावा लागतो. सरकारचा कोल्हापूर जनतेचा द्वेष का ? असा प्रश्न जनतेला पडलेला आहे. आता तरी लोकप्रतिनिधी केंद्र सरकार रेल्वे मंत्रालयाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दयायलाच हवे. नवनिर्वाचित खासदार छत्रपती शाहू महाराज यांनी सदर संस्थेला सहकार्य करुन भारतीय रेल्वेचा इतिहास व तो घडवणारे महापुरुष यांचा इतिहास मांडलेला आहे. यांचे गांभीर्य लक्षात घेऊन मंजुरीअंती रेल्वेमार्गाची सुरुवात करावी हेच कोल्हापूरकर ग्रामीण जनतेच्या हिताचे ठरेल !!

# प्रेयसीच्या मुलीवर बलात्कार, फरार आरोपीला ४ वर्षांनी अटक

**वसई** : प्रेयसीच्या मुलीवर बलात्कार करून फरार झालेल्या आरोपीला गुन्हे शाखा ३ च्या पथकाने ४ वर्षांने हरिद्वार येथून अटक केली. नाव बदलून तो पोलिसांना गुंगारा देत होता. आरोपी अनिल बिडलान हा याचे नालासोपारा येथील एका महिलेशी प्रेमसंबध होते. या महिलेला पहिल्या पतीपासून १८ वर्षांची मुलगी आहे. बिडलान या महिलेच्या घरी ये-जा करत होता. २०२१ मध्ये पीडित मुलीची आई कामाला गेली होती. त्यावेळी आरोपी बिडलान तिच्या घरी गेला. त्याने तिला कामाच्या बहाण्याने एका निर्जन स्थळी नेले आणि तिच्यावर बलात्कार केला. या घटनेमुळे मुलीला प्रचंड मानसिक धक्का बसला होता. या प्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात बिडलान विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु तेव्हापासून तो फरार होता. आरोपी बिडलनाच्या प्रकरणाचा तपास मिरा भाईंदर वसई विरार पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. पोलिसांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण करून तपास सुरू केला. बिडलना हा उत्तराखंडच्या हरिद्वार येथे नाव बदलून रहात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी त्याला सापळा लावून अटक केली. पुढील तपासासाठी त्याला नालोसापारा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. गुन्हे शाखा ३ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक उमेश भागवत, अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्वीन पाटील आदींच्या पथकाने या आरोपीला पकडण्यात यश मिळवले.




# महापालिकेविरोधात विविध मागण्यांसाठी कामगारांचे अर्ध नग्न आंदोलन




**मीरा रोड** : मीरा भाईंदर महापालिकेतील सफाई कर्मचारी व उद्यान विभाग कामगारांना गेल्या काही वर्षांपासून ठेकेदाराकडून किमान वेतनानुसर पगार मिळत नाही, पगारातील वाढीव फरक , ग्रॅज्यूटी अशा विविध मागण्या आहेत. अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही महापालिका अधिकारी या मागण्याकडे दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे श्रमजीवी संघटनेने दैनंदिन साफ सफाई आणि उद्यान विभाग कामगारांच्या प्रलंबित मागण्या पुर्ण करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी महापालिका मुख्यालयाबाहेर अर्ध नग्न आंदोलन केले. मीरा भाईंदर महापालिकेत मनुष्यबळाअभावी अनेक विभागाचे काम करण्यासाठी महापालिकेने ठेकेदाराची नियुक्ती केली आहे. या ठेकेदारांकडून ठेका पद्धतीवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जात आहे. या ठेकेदारांकडून आरोग्य विभाग दैनंदिन साफसफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त व मयत कंत्राटी सफाई कामगारांना ग्रॅज्यूटी मिळत नाही, उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील कर्मचाऱ्यांना ग्रॅज्यूटी , सुट्टीचा पगार दिला जात नाही, २०२१ ते २०२३ पर्यंतचा वाढीव डी.ए. (घ.छ.) चा फरक कामगारांना मिळालेला नाही , दोन्ही विभागांतील कामगारांना दोन वर्षापासून सॅन्डल दिलेले नाही तसेच किमान वेतनानुसार पगार किमान वेतन १८,७०० पण कामगारांना १६,२०० रुपये इतकेच वेतन दिले जात आहे. कामगारांच्या अशा अनेक मागण्या आहेत त्या ठेकेदार पुर्ण करत नसताना महापालिका अधिकारी हे ठेकेदाराला पाठीशी घालत असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. श्रमजीवी संघटना ही नेहमी कामगारांच्या पाठीशी असून कामगारांच्या मागण्या पुर्ण झाल्या पाहिजेत, कामगार हे त्यांच्या हक्कासाठी लढत आहेत. महापालिकेने कामगारांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी श्रमजीवी संघटनेने आंदोलन केले होते. महापालिकेने कामगारांच्या मागण्या २५ दिवसांत पूर्ण करण्यात येतील असे लेखी उत्तर दिल्यामुळे आंदोलन मागे घेण्यात आले आहे. १५ दिवसांत मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर पुन्हा आंदोलन करण्यात येइल असे कामगार नेते सुलतान पटेल यांनी सांगितले आहे.

# पालघर चे उप जिल्हाधिकारी संजीव जाधवर यांना लाच लुचपत प्रतिबंध विभागाने रंगेहात पकडले

**पालघर** : पालघर जिल्हाधिकारी कार्यालयातील सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर यांना एका प्रकरणात ५० हजार रुपयाची लाच घेताना मुंबई च्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी त्यांची बदली झाली असताना त्यांनी पदभार सोडला नव्हता. मुंबईच्या लाच लुचपत प्रतिबंध विभागाच्या पथकाने त्यांच्या कार्यालयात सापळा रचून त्यांच्या कार्यालयातच त्यांना अटक केली.



पालघर मधून त्यांची बदली रत्नागिरी जिल्ह्यातून राजापूर येथे झाली होती. मात्र एक वर्ष वाढवून मिळावे ह्यासाठी ते प्रयत्नशील होते. वाडा येथील एका आदिवासी खातेदारकाची जमीन नावावर करण्यासाठी आदिवासी असलेले तक्रारदार आपले प्रकरण मंजूर करण्यासाठी गेले होते. नियमानुसार सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनही मान्यता देण्यासाठी उपजिल्हाधिकारी जाधवर यांनी तक्रारदाराकडे ५० हजाराची लाच मागितली होती. तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्याने मुंबईच्या प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. मंगळवारी दुपारी राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग याच्या अध्यक्षांची पत्रकार परिषद पूर्ण केल्यानंतर ते आपल्या कार्यालयात आले. त्यानंतर तक्रारदारानी त्यांच्या कार्यालयात येऊन संपर्क साधल्यानंतर कार्यालयातच ५० हजार रुपयाची लाच स्वीकारताना त्यांच्यावर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने झडप घातली. या प्रकरणी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया उशिरा पर्यंत सुरू होती. या प्रकारामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात एकच खळबळ मजली आहे.

# डॉ. दुधभाते यांच्या जागी वैद्यकीय आरोग्य अधिकारी पदी डॉ. प्रमोद पडवळ यांची नियुक्ती

**मीरा रोड** : मीरा भाईंदर महापालिकेचे मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. बिरप्पा दुधभाते यांना लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी अटक केली होती. तेव्हापासून हे पद रिक्त होते. या रिक्त झालेल्या पदाचा अतिरिक्त पदभार म्हणुन डॉ. प्रमोद पडवळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मीरा भाईंदर महापालिकेच्या मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारीपदी राज्य शासनाने डॉ. बिरप्पा दुधभाते यांची प्रतीनियुक्ती केली होती. डॉ. दुधभाते यांना २ ऑगस्ट रोजी एका लॅबला परवाना देण्यासाठी ४ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी अटक केली आहे. वैद्यकीय आरोग्य अधिकारी दुधभाते यांच्या विरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलमानुसार कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सार्वजनिक आरोग्य विभागाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे पद रिक्त आहे. हे पद रिक्त असल्यामुळे महापालिका मुख्यालयात जन्म – मृत्यु दाखले दुरूस्ती करण्यासाठी येणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत होती. नागरिकांनी कामांसाठी महापालिका दप्तरी हेलपाटे मारावे लागत होते. त्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती करण्याची नागरिकांकडून मागणी केली जात होती. त्यानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग या पदाचा पदभार डॉ. प्रमोद पडवळ, माता व बालकल्याण अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त स्वरूपात देण्यात आला आहे.

# मतदान केंद्रांच्या संख्येत वाढ होणार; हजार-बाराशे मतदारांमागे एक मतदान केंद्र

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्राबाहेर लागलेल्या रांगा लक्षात घेऊन विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी मतदान केंद्रांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक मतदान केंद्रामध्ये (बूथ) पूर्वी असणारी सरासरी १५०० मतदारांची संख्या आता सरासरी १००० ते १२०० इतकी असेल. त्यामुळे मतदान केंद्रांच्या संख्येत वाढ होणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या वेळी मतदानाचे प्रमाण व वेग वाढण्यास मदत होणार आहे. तसेच मतदारांची संख्या व परिसर यांचा ताळमेळ घालून मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सध्या राज्यात मतदार यादी अद्ययावत करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. मुंबईसाठी महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. त्यामुळे विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत मुंबई महानगरपालिका मुख्यालयात शुक्रवारी महापालिका आयुक्तांनी बैठक घेतली. मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा या दोन्ही जिल्ह्यांमध्ये मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या कार्यक्रमाची जनजागृती करण्यात आली आहे. त्यासोबत राजकीय पक्षांनीही आपापल्या परीने या कार्यक्रमाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी, जेणेकरुन मतदार नोंदणीचे पर्यायाने मतदानाचे प्रमाण वाढवण्यास मदत होईल, असे आवाहन भूषण गगराणी यांनी केले. जिल्हा निवडणूक अधिकारी या नात्याने भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या आढावा बैठकीमध्ये विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले होते. अतिरिक्त जिल्हा निवडणूक



अधिकारी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई उपनगरे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, तसेच महानगरपालिकेचे सहआयुक्त (मध्यवर्ती खरेदी खाते) विजय बालमवार व संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. सध्या सुरू असलेला मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम २० ऑगस्टपर्यंत राबविण्यात येणार आहे. त्यानंतर ३० ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. नवमतदारांची नोंदणी, मतदारांच्या नावासमवेत मोबाइल क्रमांक जोडणे इत्यादी प्रक्रियांची माहिती या बैठकीत देण्यात आली. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी त्यावर आपापली मते व सूचना मांडल्या. गगराणी म्हणाले की, महानगरपालिका क्षेत्रातील अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहचतानाच मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी यंत्रणांच्या प्रयत्नांना राजकीय पक्षांनीही आपापल्या परीने सहकार्य करण्याची गरज आहे. मतदारांना अधिकाधिक सुलभ पद्धतीने मतदानाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी यंत्रणेसोबतच राजकीय पक्षांनीही एकत्रित प्रयत्न करावेत. सध्या मुंबई महानगरात मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाची पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्यात यावी, जेणेकरून अधिकाधिक मतदार नोंदवले जातील, अशी सूचना गगराणी यांनी केली. मतदान केंद्राच्या सुसूत्रीकरणाची सुधारित माहिती करून देण्यासाठी निवडणूक यंत्रणेच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसिद्धी प्रक्रिया सुरू झाली आहे. मतदान केंद्रांची माहिती नागरिकांपर्यंत पोहेचावी यासाठी हे जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती देखील यावेळी देण्यात आली. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रांच्या बाहेर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी अतिरिक्त वेळ द्यावा लागला. त्यामुळे पहाटेपासून आलेले निवडणूक कर्मचारी दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंत रखडले होते. तसेच मतदारांनाही प्रचंड उकाड्यात ताटकळावे लागले होते. त्यावरून खूप टीका झाली होती. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीला शिवसेना शिंदे गटाचे माजी खासदार राहुल शेवाळे, माजी आमदार मनिषा कायंदे उपस्थित होते. या बैठकीकडे इतर सर्व पक्षांनी पाठ फिरवल्याची चर्चा सुरू होती. दरम्यान, महापालिका प्रशासनाने सर्व राजकीय पक्षांच्या कार्यालयांमध्ये या बैठकीचे निमंत्रण पाठवले होते, अशी माहिती महापालिका प्रशासनाने दिली.

# मालमत्ताकराचे सर्वेक्षण करणाऱ्या एजन्सीकडून लूट, हितेंद्र ठाकूरांकडून एजन्सी काढून टाकण्याचे निर्देश

**वसई:** वसई विरार मध्ये वाढीव मालमत्तांचा शोध घेण्यासाठी पालिकेने नेमलेली एजन्सी तडजोडी आणि आर्थिक लूट करत असल्याचे समोर आले आहे. ही खासगी एजन्सी त्वरीत काढून टाका आणि पालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत सर्वेक्षण करा असे निर्देश आमदार हितेंद्र ठाकूर यांनी दिले आहेत. यापूर्वी देखील विधानसभेत आमदार राजेश पाटील यांनी एजन्सी आर्थिक लूट करत असल्याचा आरोप केला होता. आमदारांच्या या विरोधामुळे मालमत्ता सर्वेक्षण मोहीम पालिकेला गुंडाळावी लागण्याची शक्यता आहे. मागील काही वर्षांपासून वसई विरार शहराचे नागरिकरण वाढले आहे. त्यातच विविध प्रकारच्या व्यावसायिक आस्थापना सुद्धा तयार झाल्या आहेत. तर काही ठिकाणी व्यावसायिक आस्थापनांचे वाढीव बांधकाम करण्यात आले आहे. अशा मालमत्तांचे नव्याने सर्वेक्षण न



झाल्याने जुन्याच क्षेत्रफळाच्या आधारे कर आकारणी केली जात होती. सद्यस्थितीत शहरात १ लाख ४२ हजार इतक्या व्यावसायिक मालमत्ता आहेत. त्यामुळे मालमत्ता कर वाढीसाठी वाढीव मालमत्तांचा जीआयएस प्रणाली द्वारे सर्वेक्षण करण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता. त्यासाठी खासगी एजन्सी नेमून मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार मागील वर्षी ऑगस्ट मध्ये मेसेर्स सीई इन्फो सिस्टीम लिमिटेड या कंपनीला देण्यात आले होते. जीआयएस प्रणाली द्वारे सर्वेक्षण करून मालमत्तेची डिजिटल स्वरूपातील छायाचित्रे जिओ-टॅगिंग, अंतर्गत व बाह्य मोजमाप आणि त्यांचे कार्पेट, बांधकाम क्षेत्र डिजिटल उपकरणाद्वारे मोजमाप करणे असे या कामाचे स्वरूप होते. मात्र ही एजन्सी सर्वेक्षणाच्या नावाखाली तडजोडी करत असल्याच्या तसेच औद्योगिक कंपन्यांकडून आर्थिक लूट करत असल्याच्या तक्रारी येत होत्या. त्याचे पडसाद गुरूवारी झालेल्या जनता दरबारात उमटले. पालिकेच्या खासगी एजन्सीकडून आर्थिक लूट होत असल्याने आमदार हितेंद्र ठाकूर चांगलेच भडकले. मालमत्ता धारकांना वाढीव देयके देऊन आर्थिक लूट करीत असतात असा आरोप त्यांनी यावेळी केला. या एजन्सी सर्वात आधी काढून टाका असे आदेश आमदार हितेंद्र ठाकूर यांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. या सर्वेक्षणाच्या नावाखाली जुन्या ग्रामपंचायतीमधील घरांना वाढीव घरपट्टी आकारली जाते तसेच ती तोडण्याची कारवाई केली जात असल्याचा आरोप बोईसरचे आमदार राजेश पाटील यांनी जुलै महिन्यातील पावसाळी अधिवेनात केला. पालिकेत सध्या प्रशासकीय राजवट आहे. ते मनमानी पध्दतीने असे सर्वेक्षण करत असून सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरत असल्याचे त्यांनी सांगितले होते. सध्या सुरू असलेले हे सर्वेक्षण थांबवावे तसेच घरांना लावलेली वाढीव घरपट्टी रद्द करावी अशी मागणी त्यांनी सभागृहात केली होती. आमदार राजेश पाटील आणि आता आमदार हितेंद्र ठाकूर यांनी देखील एजन्सीकडून लूट होत असल्याचा आरोप केल्याने पालिकेला खासगी एजन्सी मार्फत सर्वेक्षणाचा गाशा गुंडाळावा लागण्याची शक्यता आहे. आमदार हितेंद्र ठाकूर यांचा दबदबा असल्याने त्यांच्या संमतीशिवाय कुठलेही काम वसई विरार महापालिकेला करता येत नाही. त्यांनी विरोध केला तर पालिकेला आपले निर्णय रद्द करावे लागतात. दोन वर्षांपूर्वी नवीन मालमत्ता शोधण्यासाठी पालिकेने शहराचा ड्रोन द्वारे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार खासगी कंपनीला काम देऊन ७० कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली होती. परंतु आमदार हितेंद्र ठाकूर यांनी या सर्वेक्षणाला विरोध केला होता. त्यामुळे ती निविदा पालिकेला रद्द करावी लागली होती.

OWNER, PRINTER, PUBLISHER & EDITOR BY ANIL RAJARAM PAWAR PRINTED AT M/S SOMANI PRNITING PRESS, UNIT NO.04, GROUND FLOOR, N.K. INDUSTRIAL ESTATE, OFF AREY ROAD, NEAR PARVASI IND. ESTATE, GATE NO. 2, GOREGAON EAST, MUMBAI-400063, & PUBLISH AT M/81, MARIAMMA NAGAR, WORLI, DR A.B. ROAD,BEHIND NEHRU CENTRE, WORLI MUMBAI - 400018. MAHARASHTRA , Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789 , Mob. 9867110318

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अनिल राजाराम पवार यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.४, ग्राउंड फ्लोअर, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०००६३ महाराष्ट्र येथून मुद्रित, एम/८१,मरिम्मा नगरए वरळी, डॉ. ए.बी. रस्ता, नेहरू सेंटरच्या मागे, वरळी,मुंबई ४०००१८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. मो. ९८६७११०३१८, Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789